(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN - U40109MH2005SGC153645
४था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
Tel. 2641 2211 / 2647 2131 Fax : 022-26478749 Website : www.mahadiscom.in email : cgmpf@mahadiscom.in

क्र.मासं/कनिष्ठ सहाय्यक/समावेशन/ 7 8 1 8 ,                                          दिनांक: 23 OCT 2020

प्रति,
१. सह-व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक विभाग,
औरंगाबाद / कल्याण
२. प्रादेशिक संचालक,
म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक विभाग,
पुणे / नागपुर

**विषय : कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यांना नियमित पदी सामावून घेणेबाबत**

कंपनी धोरणानुसार कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यांना निम्नस्तर लिपिक (मासं)/(लेखा) या नियमित पदांचा उपलब्ध अनुशेष व रिक्त पदांनुसार ३ वर्षांच्या कालावधीकरीता कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यात येते. तद्नंतर कंत्राटी कालावधी समाधानकारक पूर्ण करणाऱ्या कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यांना निम्नस्तर लिपिक (मासं)/(लेखा) पदी सामावून घेण्यात येते.

तथापि, काही परिमंडळांमध्ये उपलब्ध रिक्त पदे/अनुशेष यांपेक्षा जादा (Surplus) कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) कार्यरत आहेत. यामुळे कंत्राटी कालावधी पूर्ण केलेल्यांना निम्नस्तर लिपिक (मासं)/(लेखा) या नियमित पदी सामावून घेण्यास अडचणी येत असून संबंधीत कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यास कंत्राटी तत्वावर कार्यरत राहावे लागत आहे असे संबंधीत कर्मचारी व विविध कर्मचारी संघटनांशी होणाऱ्या चर्चेदरम्यान या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत ज्या परिमंडळांमध्ये उपलब्ध रिक्त पदे/अनुशेष यांपेक्षा जादा (Surplus) कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) कार्यरत आहेत अशा कर्मचाऱ्यांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. संबंधीत परिमंडळ स्तरावरील विनंती बदली प्रक्रिया व सांघिक कार्यालयाकडून वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांना सविस्तर पदस्थापना दिल्यानंतर रिक्त पदे व अनुशेष अहवाल सुधारीत / अद्ययावत करण्यात यावा.

२. उच्चस्तर लिपिक (मासं)/(लेखा) आणि निम्नस्तर लिपिक (मासं)/(लेखा) यापदांकरीता पदोन्नती करीता सक्षम निवड समितीची बैठक आयोजित करून पदोन्नती आदेश निर्गमीत करावेत.

३. संबंधीत परिमंडळाकडे म.रा.वि.वि.कं.मर्या. वर्गीकरण व सेवाप्रवेश सेवाविनियम, २००५ मधील Appendix-G (CS २८) अंतर्गत कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) या पदासाठीचे असणारे अर्ज परिमंडळांतर्गत उपलब्ध रिक्त पदे व अनुशेषानुसार निर्णयीत करावेत.

४. ज्या कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यांना रिक्त पदे व अनुशेष याअभावी निम्नस्तर लिपिक (मासं)/(लेखा) पदी सामावून घेणे शक्य झालेले नाही त्यांना प्रादेशिक विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत अन्य परिमंडळाकडे तेथील रिक्त पदे व अनुशेषानुसार वर्ग करण्यात यावे. तथापि, असे करण्यापुर्वी संबंधीत कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यांचेकडून परिमंडळाबाहेर पदस्थापनेकरीता लेखी संमती (Consent) घेण्यात यावी.

५. उपरोक्त प्रक्रिया राबवून देखील ज्या कनिष्ठ सहाय्यक (मासं)/(लेखा) यांना प्रादेशिक विभागांतर्गत सामावून घेणे शक्य होणार नाही अशांचे प्रस्ताव सांघिक कार्यालयाकडे उमेदवारांच्या संमती पत्रासह वर्ग करण्यात यावे.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(सेवानिवृत्त)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**
संचालक (वित्त)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई

**प्रत सस्नेह सादर:**
मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., सर्व परिमंडळ कार्यालये

**प्रत रवाना:**
१. महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई